



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २९४, शनिवार १० ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# पारनेरात सबाजीराव गायकवाड लाडकी शेतकरी बहिण योजना!

■ जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांची घोषणा ■ महिलांनी घेतलेल्या ट्रॅक्टरचा एक हप्ता गायकवाड भरणार ■ पहिल्या ५० शेतकरी भगिनींना लाभ

पारनेर : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या धर्तीवर पारनेर तालुक्यात कृषीभुषण सबाजीराव गायकवाड माझी लाडकी शेतकरी बहिण योजना राबविण्यात येणार असल्याची घोषणा जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांनी शुक्रवारी पारनेर येथे केली. येत्या १५ ऑगस्ट रोजी सबाजीराव गायकवाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ट्रॅक्टरच्या चाव्यांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.**





गायकवाड यांनी सांगितले की, शेतामध्ये लाडकी बहिण राबते. पिकांचे संवर्धन करते. या बहिणीच्या सन्मानासाठी काहीतरी द्यावे या हेतूने ही योजना राबविण्यात येणार आहे. महिलांसाठी बचत गटाची योजनाही चांगली आहे. मात्र या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नाही .जिल्हा बँकेकडेही बचत गटांसाठी चांगल्या योजना आहेत. बँकेच्या माध्यमातून बचत गटांसाठी प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

## काय आहे योजना ?

सबाजीराव गायकवाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकरी कुटूंबातील महिलांसाठी ही योजना राबविण्यात येईल. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी आपला अर्ज सेवा संस्थेच्या सचिवाकडे दिल्यानंतर तालुक्यातील पहिल्या ५० भगिनींना या योजनेचा लाभ देण्यात येईल. थकबाकीदार नसलेल्या भगिनीने शेतीच्या कामासाठी ट्रॅक्टर खरेदी केल्यानंतर शेवटचा हप्ता कृषीभुषण सबाजीराव गायकवाड कृषी प्रतिष्ठाणच्या वतीने भरण्यात येईल. सुरूवातीचे सर्व हप्ते नियमित भरणे बंधनकारक असेल. शेवटच्या हप्त्याची सुमारे ५० लाख रूपयांची रक्कम १५ ऑगस्ट रोजीच जिल्हा बँकेच्या शाखेत ठेवीच्या स्वरूपात जमा करण्यात येणार असल्याचे गायकवाड म्हणाले.

## बँकेचे कर्मचारी, सचिव यांना प्रशिक्षण

केंद्र तसेच राज्य शासनाच्या सहकार कायद्यामध्ये अमुलाग्र बदल झाले असून सहकार विभागाचे कामकाज स्मार्ट झाले आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी बँकेचे कर्मचारी, सेवा सोसायटीचे सचिव यांना लवकरच प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

## पीक विम्याचा लाभ घ्या

केंद्र व राज्य शासनाच्या शेतकऱ्यांसाठी अनेक चांगल्या योजना आहेत. या योजना तळागाळापर्यंत पोहचत नाही ही खेदाची बाब असून त्यामुळे शेतकरी होरपळला जातो. एक रूपयामध्ये पीक विमा योजना असूनही अनेक शेतकरी त्याकडे दुर्लक्ष करतात. शेतकऱ्यांनी पीक विम्याचा लाभ घेण्याचे आवाहन गायकवाड यांनी केले.

## कांद्याच्या याचिकेवर लवकरच सुनावणी

कांद्याला जिवनावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळावे व हमीभाव द्यावा यासाठी आपण मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असून या याचिकेवर लवकरच सुनावणी होणार आहे. ही याचिका अभ्यासपुर्ण असून त्यामुळे देशात दाखल झालेल्या याचिकांची या याचिकेसमवेत सुनावणी होणार असल्याचे गायकवाड म्हणाले.

## वसुलीत पारनेर तालुका पहिला

पारनेर तालुका हा प्रामुख्याने जिरायत भाग असलेला तालुका आहे. दुष्काळ, अवकाळी पाउस, गारपीट अशा संकटांचा सामना करूनही तालुक्यातील शेतकऱ्यांनी सेवा सोसायटयांची शंभर टक्के वसुली करून जिल्हयात पहिला क्रमांक मिळविला ही शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून आपण शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजना आपण जिल्हाभर राबवित असल्याचेही गायकवाड यांनी नमुद केले.

# खा. लंके यांनी बनपिंप्री येथील टोल वसुली थांबविली

## अपूर्ण काम असतानाही सुरू होती टोल वसुली

नगर : प्रतिनिधी

**नगर-सोलापुर महामार्गावरील बनपिंप्री येथील टोल नाक्यावर करण्यात येणारी टोल वसुली खा. नीलेश लंके यांनी शुक्रवारी थांबविली. या रस्त्याचे काम अपुर्ण असतानाच टोल वसुल करण्यात येत असल्याने खा. लंके यांनी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून काम पुर्ण झाल्याशिवाय टोल आकारू नये अशा सुचना दिल्या, त्यानंतर ही वसुली थांबविण्यात आली.**



■ नगर-सोलापूर मर्गावरील रस्त्याचे काम अपुर्ण असतानाही टोल वसुली करण्यात येत असल्याने खा. लंके यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून काम पुर्ण होईपर्यंत टोल वसुली थांबविण्यात आली.

नगर-सोलापुर मार्गाचे काम अद्याप अपुर्ण आहे. काम अपुर्ण असतानाही टोल वसुली करण्यात येत असल्याबाबत खा. लंके यांच्याकडे यापूर्वी काही तक्रारी आल्या होत्या. शुक्रवारी सायंकाळी खा. लंके हे नगर-सोलापुर मार्गाने जामखेडकडे जात असताना बनपिंप्री टोलनाक्यावर वाहनांकडून टोल वसुली करण्यात येत होती. त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना जाब विचाल्यानंतर त्यांनी वरिष्ठांकडे बोट दाखविले. खा. लंके यांनी संबंधित ठेकेदार कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून काम अपुर्ण असताना टोल वसुली करण्याचे कारण काय असा सवाल लंके यांनी केला. त्यावर अधिकाऱ्यांकडे उत्तर नव्हते. काम पुर्ण होईपर्यंत टोल वसुली थांबविण्यात येईल असे अधिकाऱ्याने खा. लंके यांनी सांगितले व संबंधित कर्मचाऱ्यांना टोल वसुली न करण्याबाबत सुचना दिल्या.

खा. लंके यांनी या प्रश्नात लक्ष घालून टोल वसुली थांबविल्याबद्दल या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी लंके यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# निंबळकच्या उड्डाणपुलाचे गाऱ्हाणे रेल्वेमंत्र्यांकडे!

■ खा. नीलेश लंके यांनी पुन्हा घेतली रेल्वेमंत्र्यांची भेट
■ निंबळक ग्रामपंचायतीचा वीस वर्षांपासून रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा
■ सकारात्मक निर्णयाची अश्विनी वैष्णव यांची ग्वाही

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**निंबळक तालुका नगर येथील नगर-मनमाड रेल्वे लाईन गेट नंबर ३० वर उड्डाण पुल बांधून परिसरातील प्रवाशांची गैरसोय दूर करण्याचे निंबळक ग्रामपंचायतीचे वीस वर्षांपासूनचे गाऱ्हाणे खा. नीलेश लंके यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यापुढे मांडले. या मागणीवर सकारात्मक निर्णय घेऊन प्रवाशांची गैरसोय दूर करण्याची ग्वाही मंत्री वैष्णव यांनी दिली.**



■ निंबळक येथील नगर-मनमाड रेल्वे लाईनवरील गेट क्रमांक ३० वर उड्डाण पुल बांधण्यात यावा या मागणीचे निवेदन खा. नीलेश लंके यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन सादर केले.

मंत्री वैष्णव यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, निंबळक ग्रामपंचायतीच्या वतीने गेल्या वीस वर्षांपासून गेट नंबर ३० वर उड्डाणपुलाचे बांधण्यासाठी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा सुरू आहे. मात्र या पाठपुराव्यास अद्यापही यश आलेले नाही. हा उड्डाण पुल झाल्यास निंबळकसह परिसरातील वीस ते पंचवीस गावांतील प्रवाशांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या मार्गावरून एमआयडीसी मधील कामानिमित्त कामगारांची मोठी वर्दळ असते. या रेल्वेमार्ग अलिकडेच दुहेरी झाल्याने रेल्वे गेट १० ते १५ मिनिटांच्या अंतराने साधारण ३० ते ४५ मिनिटे बंद राहते. त्यामुळे कामगारांना कामावर पोहचण्यास उशिर होतो.

या परिसरातील रूग्णांसाठी आवष्यक असलेले रूग्णालये उर्वरीत पान ३ वर

# आमच्या घरात माझी भूमिका स्टेपनीची!

## डॉ.सुजय विखे यांचे मिश्किल भाष्य

श्रीरामपूर : प्रतिनिधी

**येथे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र मुंबईहून श्रीरामपूरच्या दिशेने निघालेल्या राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने त्यांना वेळेत कार्यक्रमासाठी पोहोचता आले नाही. त्यामुळे माजी खासदार सुजय विखे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करत कार्यक्रम पार पडला. मात्र हाच धागा पकडत सुजय विखे यांनी मिश्किल भाष्य केल्याने उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.**



डॉ.सुजय विखे म्हणाले, या कार्यक्रमात येण्याचा माझा फार संबंध येत नाही, आमच्या घरात माझी भूमिका स्टेपनीची आहे. गाडीचे मुख्य टायर पंक्चर होते, तेव्हा माझा स्टेपनी सारखा वापर करून मला पळवलं जातं. साहेब याठिकाणी येऊ शकले नाहीत म्हणजे परिवाराचा मुख्य टायर काही कारणास्तव पळू शकलं नाही. त्यामुळे स्टेपनी म्हणून मी कार्यक्रमाला आल्याचे मिश्किल वक्तव्य सुजय विखे यांनी केले.

**सुजयपर्व नावाने सुरु केले होते संपर्क कार्यालय**

महिनाभरापूर्वी या कार्यालयाचे उद्घाटन देखील सुजय विखे यांनी केले होते. या सोहळ्याला मोक्कातील आरोपी उर्वरीत पान ३ वर

# सागर बंगला माझ्या बदनामीसाठी बोलायला लावणारे ठिकाण!

## मनोज जरांगे पाटलांचा आरोप

सांगली : प्रतिनिधी

**माझ्या बदनामीसाठी बोलायला लावणारे राज्यात एकमेव ठिकाण मुंबईतील सागर बंगला असल्याचे मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी शुक्रवारी सांगलीत माध्यमांशी बोलताना सांगितले. बदनामीसाठी जातीयवादी पोलीस निरीक्षकांकडून गेवराईतील घरावर नोटीस चिकटविण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.**



सांगलीत काल झालेल्या शांतता रॅलीनंतर आज जरांगे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, मराठा आरक्षणासाठी १२ महिने उर्वरीत पान ३ वर

# अजित पवारांच्या पिंक पॉलिटिक्सवर सर्वत्र चर्चा

## खा.अमोल कोल्हेंकडून टीकास्त्र

जुन्नर : प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेला गुरूवारी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथून सुरुवात झाली. यात्रेत पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनीही सहभाग घेतला असताना सर्वांचे लक्ष जनसन्मान यात्रेतील गुलाबी रंगाची वाहने वेधून घेत आहेत. या गुलाबी वाहनांच्या माध्यमातूनमहिला केंद्रीत योजनांची जनजागृती केली जातेय. मात्र अजित पवारांच्या या पिंक पॉलिटिक्सवर आता सर्वत्र टीका होऊ लागली आहे. शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनीही अजित पवारांना लक्ष्य केले आहे.**



अमोल कोल्हे यांनी जुन्नर येथून शिवस्वराज्य यात्रेला सुरुवात केली आहे. या शिवस्वराज्य यात्रेत संबोधित करताना त्यांनी राज्य सरकारच्या विविध योजनांची दुसरी बाजू मांडली. या योजना फक्त दोन महिन्यांपुरत्या असल्याचेही ते म्हणाले. एवढंच नव्हे तर त्यांनी यावेळी अजित पवारांवरही थेट टीका केली. ते म्हणाले, नागपंचमीच्या सणाचं वैशिष्ट्य आहे. आम्ही सापाला दूध पाजणं म्हणत नाही. शेतकऱ्यांसाठी हा कृतज्ञतेचा सण आहे. म्हणून आपण नागदेवतेची पूजा करतो. पण या सणाचं स्वरुप आजकाल नागाचे दात काढून नंतर पुंगी वाजवून त्याला डोलायला लावणं इथपर्यंत झालंय. हा फरक समजून घ्या. कारण गुलाबी रंगाची पुंगी वाजवून योजनांचा आवाज काढत जनतेचा नाग डोलतो का काय हे बघण्याचा प्रयत्न सुरू होत असताना जनता मात्र कृतज्ञ आहे.''.

महायुती सरकारने गेल्या काही दिवसांपासून अनेक महिला केंद्रीत योजना आणल्या आहेत. तसंच, महिला मतदारांना आकर्षित करण्याकरता विविध कार्यक्रमस्थळी गुलाबी रंगांचा सर्वाधिक वापर केला जातोय. एवढंच नव्हेतर हल्लीअजित पवारगुलाबी रंगांचंच जॅकेट घालत आहेत. त्यामुळे त्यांच्या या पिंक पॉलिटिक्सकडे आता सर्वांचं जाणीवपूर्वक लक्ष आहे. यावरूनचअमोल कोल्हेयांनी त्यांना त्यांचं नाव घेता लक्ष्य केलं.

दरम्यान, अमोल कोल्हेंनी अजित पवारांवर उर्वरीत पान ३ वर









# चंदेरी

## जॉन अब्राहम अन् अल्लू अर्जुनची बॉक्स ऑफिसवर होणार टक्कर





**चाहते अनेक दिवसांपासून अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट जेव्हा थिएटरमध्ये दाखल होईल तेव्हा तो खळबळ उडवेल, असे चाहत्यांचे म्हणणे आहे. मात्र या चित्रपटाची टक्कर जॉन अब्राहमच्या वेद चित्रपटाशी होणार आहे. हे दोन्ही चित्रपट १५ ऑगस्टला प्रदर्शित होत आहेत. म्हणजेच या वर्षातील पहिली मोठी टक्कर १५ ऑगस्टला पाहायला मिळणार असून, जॉन अब्राहम आणि अल्लू अर्जुन आमनेसामने येणार आहेत.**

जॉन अब्राहमने त्याच्या वेद चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करताना X वर लिहिले, की या स्वातंत्र्य दिनी, ते येत आहेत... न्यायाची लढाई लढण्यासाठी. वेद १५ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. 'वेद'चे दिग्दर्शन निखिल अडवाणीने केले आहे. या चित्रपटात तमन्ना भाटिया आणि शर्वरी वाघ यांच्या प्रमुख भूमिका आहेत, तर 'पुष्पाः द रुल'चे दिग्दर्शन सुकुमार यांनी केले आहे. अल्लू अर्जुन व्यतिरिक्त या चित्रपटात रश्मिका मंदाना आणि फहद फासिलसह इतर अनेक कलाकार आहेत. हा चित्रपट हिंदीशिवाय तामिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्येही प्रदर्शित होणार आहे.

### सिंघम अगेन १५ ऑगस्टला प्रदर्शित होणार ?



रोहित शेट्टीही १५ ऑगस्टला त्याचा सिंघम अगेन चित्रपट प्रदर्शित करण्याचा विचार करत असल्याच्या बातम्या आल्या होत्या. तथापि, अद्याप रिलीजच्या तारखेबाबत निर्मात्यांकडून कोणतेही अपडेट आलेले नाही. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असल्याचे रोहित शेट्टीने सांगितले होते. जर सिंघम अगेनही त्याच दिवशी रिलीज झाला तर तो या वर्षातील बॉक्स ऑफिसवरील सर्वात मोठी टक्कर मानला जाईल.

## तणावामुळे अदा शर्माला गंभीर आजार

**अदा शर्मा आज बॉलिवूडमधील व्यस्त अभिनेत्रींपैकी एक आहे. तिचे अनेक चित्रपट आणि वेब सिरीज रिलीज झाल्या. तिला खूप पसंतीही मिळाली. पण या चित्रपटांसाठी अदा शर्माने केलेल्या शारीरिक परिवर्तनाचा तिच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. अदा शर्माने सांगितले की तिला एंडोमेट्रिओसिसचा त्रास सुरू झाला आहे.**



अदा शर्माने सांगितले की, मला या चित्रपटांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या शरीराची गरज होती. द केरळ स्टोरीसाठी पहिल्या भागात मला बारीक आणि दुबळे असायला हवे होते, जेणेकरून मी कॉलेज मुलीसारखी दिसावी. कमांडो चित्रपटासाठी मला कणखर असायला हवं होतं. सनफ्लॉवर चित्रपटासाठी मला कामुक आणि सेक्सी दिसावं लागलं, कारण मी बार डान्सरची भूमिका करत होते. 'बस्तर'साठी मला एक निरोगी आणि मजबूत शरीर अंगीकारावे लागले. बस्तर चित्रपटासाठी अदा शर्माने खूप वजन वाढवले होते. तिने सांगितले की, मी दिवसभरात सुमारे १० ते १२ केळी खाल्ली. कारण त्यांना माझे वजन वाढवायचे होते. चित्रपटात खूप अ‍ॅक्शनचे सीन होते. मलाही खऱ्या अर्थाने बलवान व्हायचे होते. कारण आमच्याकडे आठ किलो वजनाच्या, खडकाळ प्रदेश आणि पर्वतांवरून वर-खाली न्याव्या लागणाऱ्या खऱ्या बंदुका होत्या. मेवा, सुका मेवा आणि अंबाडीच्या बियांचे बरेच लाडू... मी ते नेहमी माझ्याजवळ ठेवायचे आणि झोपण्याच्या अर्धा तास आधी खायचे. अदा शर्मासाठी 'बस्तर' खूपच तणावपूर्ण चित्रपट राहिला. या काळात तिला वेट ट्रेनिंगमध्ये खूप अडचणी आल्या. ती एंडोमेट्रिओसिसची शिकार झाली. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये मासिक पाळी थांबत नाही. अदा शर्माने सांगितले की, तिला ४८ दिवस रक्तस्त्राव होत होता.


## ...म्हणून मीनाक्षी सर्वांत आधी जॅकी श्रॉफला भेटली!

**नव्वदच्या दशकात आपल्या अभिनय आणि सौंदर्याने लाखो हृदयांवर राज्य करणाऱ्या मीनाक्षी शेषाद्रीने करिअरच्या शिखरावर असताना लग्न केले अन् चित्रपट क्षेत्र सोडले. ती तिच्या पतीसोबत अमेरिकेत स्थायिक झाली आणि तिथे डान्स स्कूल अकादमी चालवू लागली. पण आता मीनाक्षी शेषाद्री भारतात परतल्यावर तिची पहिली भेट जॅकी श्रॉफशी झाली. ती त्याच्यासोबत एका फिल्म पार्टीलाही गेली होती. मीनाक्षी परत आल्यानंतर फक्त जॅकी श्रॉफला का भेटली आणि तिने इतर कोणत्याही बॉलिवूड स्टारशी का संपर्क साधला नाही याचे कारणही या अभिनेत्रीने स्पष्ट केले...**



मीनाक्षी शेषाद्रीला आता मुंबईत नव्या प्रवासाचा आनंद घ्यायचा आहे. तिला जुन्या मित्रांशी देखील पुन्हा संपर्क साधायचा आहे. मीनाक्षी नुकतीच जॅकी श्रॉफला भेटली होती आणि आता तिला संगीता बिजलानीला भेटायचे आहे. मीनाक्षीने सांगितले की, जॅकी श्रॉफ ही अशी व्यक्ती आहे ज्यांच्याशी मी परत आल्यानंतर संपर्क केला. कारण ते माझे नेहमीच अतिखास राहिले. हीरो चित्रपटापासून आमची मैत्री आहे आणि ती कायम राहिली. त्यामुळे मुंबईला आल्यावर सर्वांत आधी मी त्यांची भेट घेतली. आता ते मुंबईतील वेगवेगळ्या कार्यक्रमांना मला निमंत्रित करत आहेत. मीनाक्षी शेषाद्रीने १९८३ साली पेंटर बाबू या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. पण त्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या हीरो या चित्रपटातून त्याला स्टारडम मिळाले. या चित्रपटात मीनाक्षी शेषाद्रीचा हिरो होता जॅकी श्रॉफ. या चित्रपटामुळे दोघेही रातोरात स्टार झाले. नंतर मीनाक्षी शेषाद्रीने दामिनी, मेरी जंग, शहेनशाह, बडे घर की बेटी, प्यार का कर्ज आणि घायल यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केले. मात्र, मीनाक्षीला दुःख आहे की, तिने आणि जॅकीने हीरोमध्ये जसा करिष्मा केला होता तसा करिष्मा इतर चित्रपटांमध्ये करू शकली नाही. ती म्हणाली, की हीरोच्या यशाची पुनरावृत्ती होऊ शकली नाही. कारण जॅकी आणि मी त्यानंतर केलेल्या चित्रपटांमध्ये प्रेक्षकांना जे हवे होते ते मिळाले नाही. त्यांना तो रोमान्स दिसला नाही.

### मला 'दामिनी'मधून हाकलण्यात आले...



मीनाक्षी शेषाद्रीने अनेक संस्मरणीय चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारल्या. त्यापैकी एक म्हणजे १९९३ मध्ये प्रदर्शित झालेला राजकुमार संतोषी यांचा दामिनी. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अभिनेत्रीला वाईट अनुभव आला होता. मीनाक्षीने आता खुलासा केला की राजकुमार संतोषीचा रोमँटिक प्रपोजल आणि लग्नाचा प्रस्ताव नाकारल्यानंतर तिला चित्रपटातून वगळण्यात आले. अशा परिस्थितीतही ती कशी गप्प राहिली आणि शेवटी, प्रोड्यूसर्स गिल्डच्या पाठिंब्यामुळे पुन्हा चित्रपटात सामील होण्याची संधी कशी मिळाली याबाबत मीनाक्षी म्हणाली, की राजकुमार संतोषी जी आणि मी याविषयी न बोलण्याचा निर्णय घेतला आहे. ही गोष्ट आता जुनी झाली आहे. पण धैर्याने उभे राहणे महत्त्वाचे होते. मी गप्प राहून ते प्रकरण हाताळले. मी या चित्रपटाशी संबंधित प्रत्येकाचा, विशेषतः संतोषीजींचा आदर करते. त्यांना माझ्याकडून ज्या अपेक्षा होत्या, त्या माझ्या तत्वात बसत नव्हत्या. वेगळी तक्रार करून सनसनाटी निर्माण करण्यापेक्षा केवळ चित्रपट न सोडण्याची भूमिका घेत त्यादृष्टीने हालचाली केल्या. मला नातेसंबंध कायमचे खराब करायचे नव्हते. मीनाक्षीने १९९५ मध्ये हरीश म्हैसूरशी लग्न केले. या दाम्पत्याला एक मुलगी आणि एक मुलगा अशी दोन अपत्ये आहेत. मीनाक्षी आणि राजकुमार संतोषी यांचा एकत्र पहिला चित्रपट घायाल (१९९०) होता. दामिनीनंतर त्यांनी १९९६ मध्ये घटकसाठी पुन्हा एकत्र काम केले.

## भाभी २ तृप्ती डिमरीने खरेदी केला करोडोंचा सुंदर, आलिशान बंगला



अभिनेत्री तृप्ती डिमरी ही सध्या आनंदात आहे. कारण अलीकडेच तिने एक आलिशान बंगला खरेदी केला आहे, ज्याची किंमत १४ कोटी रुपये आहे. हा बंगला मुंबईतील पश्चिम वांद्रे भागात कार्टर रोडवर आहे. ग्राउंड प्लस दोन मजली बंगला तृप्तीने खरेदी केला आहे. तृप्ती अ‍ॅनिमल चित्रपटातून प्रसिद्धीच्या झोतात आली होती. त्याआधीही तिने अनेक चित्रपट केले होते, मात्र संदीप रेड्डी वंगा यांच्या अ‍ॅनिमलमधून तिला स्टारडम मिळाले. यानंतर तृप्तीकडे चित्रपटांच्या ऑफर्सची रांग लागली. तृप्ती लवकरच करण जोहरच्या धडक २ चित्रपटात दिसणार आहे. पण यादरम्यान तिने एक सुंदर बंगला विकत घेतला आहे. तिने ७० लाख रुपये मुद्रांक शुल्क भरले आहे. तृप्ती डिमरी यांचा नवीन बंगला २ हजार २२६ स्क्वेअर फूट आहे आणि बिल्ट-अप एरिया २ हजार १९४ स्क्वेअर फूट आहे. तिने ३० हजार रुपये नोंदणी शुल्कही भरल्याचे सांगितले जात आहे. उत्तराखंडची रहिवासी असलेल्या तृप्तीने २०१७ मध्ये श्रेयस तळपदेच्या पोस्टर बॉईज या कॉमेडी चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर आणखी काही चित्रपट केले, पण यश मिळाले नाही. पण बुलबुल चित्रपटाने तृप्ती डिमरी ला प्रसिद्धीच्या झोतात आणले. नंतर अ‍ॅनिमलने तृप्ती डिमरी यांना रातोरात स्टार बनवले. सध्या तिच्याकडे ४ चित्रपट आहेत, ज्यामध्ये धडक २ व्यतिरिक्त वाईट न्यूज, विकी विद्या का वो वाला व्हिडिओ आणि भूल भुलैया ३ यांचा समावेश आहे.


## मी कधीही पैशासाठी कोणतेही काम केलेले नाही...

### नेहा जोशीची मुलाखत : अभिनय माझ्यासाठी फक्त काम नाही, ती पूजा आहे....

**'अटल' या मालिकेत दिसलेली नेहा जोशी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या आई कृष्णादेवीची भूमिका साकारत आहे. विशेष मुलाखतीत नेहाने अभिनयापासून ते तिच्या कुटुंबापर्यंत सर्व गोष्टींचा खुलासा केला. ती म्हणाली, मी रोज पूजा करत नाही पण माझे काम रोज प्रामाणिकपणे करते...**

नेहा म्हणते, की मी माझ्या कामातून करिअरमध्ये इथंवर आले आहे. माझ्यासाठी माझे काम फक्त नोकरी नाही. मला माझे काम खूप आवडते. माझ्यासाठी माझे काम देव आणि माझी पूजा आहे. मी रोज पूजा करत नाही पण मी माझे काम रोज प्रामाणिकपणे करते. त्यामुळे रात्री मला वाटते की माझी आजची पूजा झाली आहे. त्यामुळे त्या कार्यातून मी भगवंताचे दर्शन घेतले, ही माझ्यासाठी त्याहूनही मोठी गोष्ट आहे. नेहा सांगते की तिने कधीही पैशासाठी कोणतेही काम केले नाही. नेहाच्या म्हणण्यानुसार, मला सांगायला अभिमान वाटतो की, मी कधीच केवळ पैशासाठी काम केले नाही. माझा विश्वास आहे की ही मूल्यांची बाब आहे. आमच्या शो अटलमध्येही आम्ही सांगत आहोत की अशा उंचीवर पोहोचणाऱ्या व्यक्तीचा पाया त्याच्या बालपणातच असतो. ती मूल्ये त्याला घरातूनच मिळतात. अटलजींचे वडील कृष्णा बिहारी हे शिक्षक होते तर त्यांची आई त्या काळातील सुशिक्षित महिला होती. तिथून त्यांना जी मूल्ये मिळाली त्यामुळे ते भारताच्या सर्वात प्रिय पंतप्रधानांपैकी एक बनले. त्याचप्रमाणे मी स्वतः अतिशय प्रगतीशील कुटुंबातून आले आहे. मी संयुक्त कुटुंबात वाढले. माझे आजी आजोबा, माझे चार काका, काकू, त्यांची मुले, आम्ही सर्व एकाच घरात राहत होतो. माझ्या वडिलांच्या काकू नर्स होत्या. तिने नर्सिंगचा कोर्स केला होता. ही गोष्ट सुमारे शंभर वर्षे जुनी आहे. माझ्या मावशीच्या पतीचे निधन झाले होते. मग महाराष्ट्रात पतीचे निधन झाले की स्त्रीचे केस काढले जातात. मावशीचे केस कापले नव्हते. माझ्या आजीनेही नर्सिंगचा कोर्स केला आणि माझ्या मावशीचे प्रसूतिगृह चालवले. माझे आई आणि वडील गेली पन्नास वर्षे नाशिकमध्ये थिएटर करत आहेत. माझ्या भावानेही थिएटर केले आहे, त्यामुळे माझ्या घरात अभ्यास आणि कला या दोन्ही गोष्टींना खूप महत्त्व आहे. त्यामुळे मी माझ्या कामाला खूप महत्त्व देते, असे नेहा म्हणाली.





### फक्त आईच नाही तर पडद्यावर मी वेश्याही बनले आहे...

महानायक : बी.आर. आंबेडकर, दुसरी मां आणि आता अटल... तिन्ही हिंदी मालिकांमध्ये आईची भूमिका साकारणारी नेहा म्हणते, की मी आईच्या भूमिकांबरोबरच मराठी चित्रपटात वेश्येचीही भूमिका केली आहे. मी अशी भूमिका करेन की नाही याच्या मर्यादा मी स्वतःसाठी ठेवलेल्या नाहीत. होय, असे आहे की जर ही बोल्ड भूमिका असेल तर मी नक्की बघेन की निर्माता कोण आहे? त्याने यापूर्वी कोणते काम केले आहे? जर निर्मात्याचा हेतू चांगला असेल तर त्याच्या नग्न दृश्यांमध्येही प्रामाणिकपणा आणि सभ्यता आहे. ओंकारातील प्रेम दृश्यही आपण पाहिले आहे. मी हैदरमध्ये आई-मुलाचा असा सीन पाहिला आहे जो अत्यंत जबाबदारीने केला होता, मग मला बघायचे आहे की या जवळीकीचा हेतू काय आहे? या धाडसी पात्राचा किंवा कृतीचा उद्देश काय आहे? जर ते माझ्यासाठी योग्य असेल तर मी ते करेन, कारण मी एक अभिनेता आहे, मी शिक्षक नाही. जर मी सेक्स वर्करची भूमिका करत असेल तर ती पूर्ण प्रामाणिकपणे साकारणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे.

## शॉर्ट न्यूज

### अस्वच्छतेमुळे आरोग्याचा प्रश्न बनला गंभीर

■ **नगर :** महापालिका हद्दीत पावसाच्या साचलेल्या पाण्यामुळे आणि अस्वच्छतेमुळे रोगराई सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, टायफॉइड या सारख्या आजारांचा नागरिकांना सामना करावा लागतो. त्यामुळे खासदार नीलेश लंके स्वतः जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्यक्ष मैदानात उतरले आहे. त्यांनी महापालिकेने त्वरित प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी, अशी मागणी केली आहे. महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी अस्वच्छता आणि पाणी साचल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

### नागरिकांनी वाचला समस्यांचा पाढा

■ **भंडारदरा :** अतिवृष्टीच्या तडाख्यानंतर उदभवलेल्या समस्यांचा पाढा भंडारदरा पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांनी माजी आमदार वैभव पिचड यांच्यासमोर वाचला. आता तुम्हीच काही तरी करा भाऊ, अशी आर्त साद या शेतकऱ्यांनी घातली. पिचड या शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजावून घेत त्यांना धीर देण्याचे काम करत होते. गारठ्याने शेळ्या दगावल्याचे सांगत आपली कैफियत मूतखेल येथील यादव त्र्यंबक इदे, महादू किसन कोकाटे, हिराबाई मधुकर परते यांनी पिचड यांच्याकडे मांडली. यांच्यासारख्याच समस्या काही विविध गावातील नागरिकांनी उपस्थित केल्या.

### माजी महसूलमंत्र्यांनी फक्त पदे उपभोगली

■ **श्रीरामपूर :** साडेसात वर्षे महसूलमंत्रीपद उपभोगणाऱ्यांनी श्रीरामपूरातील खंडकरी शेतकऱ्यांना काहीही दिले नाही. याउलट जे २० वर्षे होऊ शकले नाही, ते आताचे राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी करून दाखवत खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी विनामूल्य वर्ग १ केल्या असल्याचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी म्हटले आहे. श्रीरामपूर भारतीय जनता पार्टीसह शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्यावतीने महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

### संभाजी ब्रिगेडच्या आंदोलनाला यश

■ **श्रीगोंदा :** मांडवगण एसटी स्टॅण्ड ते मराठी शाळा या मुख्य रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली होती. संभाजी ब्रिगेडच्या वतीने रस्त्यावरील खड्ड्यात वृक्षारोपण करून सार्वजनिक बांधकाम खात्याचे याकडे लक्ष वेधण्यात आले होते. या रस्त्याने शाळेतील शालेय विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होयची तसेच रस्ता रस्ता जागोजागी खड्डे पडल्याने रस्त्याची दुरवस्था झाली होती. संभाजी ब्रिगेडच्या आंदोलन नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे वराळे यांच्या वतीने रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन संभाजी ब्रिगेडला देण्यात आले होते.

### विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा

■ **राहुरी :** महाविकास आघाडी सरकारच्या काळात आलेल्या निधीला खोड घालून स्थगिती देण्याचे काम भाजप सरकारने केले. सदर कामे अखेर न्यायालयीन लढा देऊन मंजूर करून घेतली. मात्र आता पाच वर्षे झोपलेल्या भाजपच्या नेत्यांना जाग आली आणि कामाचे श्रेय घेण्यासाठी जीवाचा आटापिटा करत असल्याचा आरोप माजी मंत्री आमदार प्राजक्त तनपुरे यांनी केला. राहुरी तालुक्यातील धानोरे येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार प्राजक्त तनपुरे बोलत होते. यावेळी धानोरे परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# मुख्य न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्याकडून न्यायालयाच्या बांधकामाची पाहणी

## ■ शिरुर न्यायालय इमारतीचे काम प्रगतीपथावर
## ■ काम लवकर पूर्ण करण्याच्या बांधकाम विभागाला सूचना

**शिरूर : प्रतिनिधी**

**शिरूर येथे सुमारे ४५ कोटी रुपये खर्चून उभ्या राहत असलेल्या न्यायालयाच्या अद्ययावत नवीन इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. गुरुवारी (ता. ८) पुणे जिल्ह्याचे मुख्य न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी याठिकाणी भेट देत कामाची पाहणी केली. कामाचा आराखडा, रचना आणि सध्या सुरु असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.**



शिरूर शहरामध्ये ब्रिटीशकालीन न्यायालयाची इमारत अतिशय जीर्ण झाली होती. त्यात न्यायालयातील वाढत्या केसेस, पक्षकारांची वाढती संख्या त्याचबरोबर वकिलांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे सध्याची इमारत अपुरी पडत होती. याशिवाय शिरूर बार असोसिएशनची ही नवीन इमारतीची मागणी होती. या सर्वांची दखल घेऊन शासनाने न्यायालयाच्या अद्ययावत नवीन इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे.

गुरुवारी (ता. ८) पुणे जिल्ह्याचे मुख्य न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी या न्यायालयाच्या बांधकामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देत पहाणी केली व कामाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी त्याच्यांसोबत घोडनदी बार असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या भेटीनंतर श्री. महाजन यांनी घोडनदी न्यायालयाची तात्पुरती सोय केलेल्या कुकडी कॉलनीमधील न्यायालयाचीही पाहणी केली.

फ्युअल गॅस लाइनसाठी ५० हजार रुपये, बायो डायजेस्टरसाठी २ लाख रुपये, रेन रूप वॉटर हार्वेस्टिंगसाठी पाच लाख रुपये, सोलर रूप टोप करिता ५ लाख रुपये, अपंगांसाठी सरकता जीना ३ लाख ५० हजार रुपये, फर्निचरकरिता एक कोटी ६७ लाख १० हजार रुपये, पाणीपुरवठा व मलनिस्सारण यासाठी ९४ लाख ९६ हजार १५० रुपये, अंतर्गत विद्युतीकरण करण्यासाठी ९४ लाख ९६ हजार १५०, बाह्य विद्युतीकरण यासाठी १ कोटी १३ लाख ९५ हजार ३८० रुपये, अग्निशमन यंत्रणा

२५ लाख रुपये, कंपाउंड वॉल व गेट, अंतर्गत रस्ते, मैदानाचा विकास, वाहतूक व्यवस्था, जमीन सपाटीकरण, माती परीक्षण व भूमी परीक्षण, सीसी. ड्रेन व सिडी वर्कसाठी १ कोटी ९५ लाख ४७ हजार ७३० रुपये, रेन हार्वेस्टिंग सिस्टिम भू अंतर्गत वॉटर टँक, वॉटर मेन स्टोअरेज व पंपहाउस बोअरवेल, वातानुकूलित यंत्रणा, लिफ्ट, बाह्य स्वच्छतागृह, एबी रूम, एरिया लिफ्ट, बाह्य स्वच्छतागृह, एबी रूम, एरिया लायटिंग, पंप, जनरेटर, सीसीटीव्ही व इतर सर्व तरतुदी खर्च मिळून या न्यायालयासाठी ४५ कोटींच्या कामांचे नियोजन करण्यात आले आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

### सौ चराग़ जलते हैं इक चराग़ जलाने से

चिराग़ किंवा चराग़ हा मूलतः फ़ारसी पुल्लिंगी शब्द आहे. फ़ारसीतूनच तो उर्दूत आणि हिंदी भाषेत आला. मराठीत त्याचा अर्थ दिवा असा होतो. त्यालाच हिंदी भाषेत दिया किंवा चिरागही म्हणतात.

चिराग़ फार सुंदर शब्द आहे. या शब्दावर अनेक सुंदर उर्दू शेर आढळतात.

**बुझ रहे हैं चिराग़े-दैरो-हरम।**
**दिल जलाओ कि रौशनी कम है।।**



सहाब क़ज़लबाश म्हणतात, मंदिर आणि मशिदीतले दिवे आता विझत चालले आहेत. मंद होत चालले आहेत. आता प्रकाश कमी होत चालल्याने आपल्या आत्म्याचे दिवे पाजळायला हवेत! ही सूफ़ी दर्शनाची भाषा आहे. सनातन धर्मावर यातून टीका केलेली आहे.

**शहर के अंधेरे को इक चराग़ काफ़ी है।**
**सौ चराग़ जलते हैं इक चराग़ जलाने से।।**

शहरातील अंधार घालविण्यासाठी एक दिवा पुरेसा आहे. एक दिवा तेवल्याने शंभर दिवे प्रकाशमान होतात! आचार्य रजनीशही म्हणत, जो एक पाऊल चालू शकतो तो शेकडो पावले चालू शकतो. तोच तात्त्विक भाव या शेरात उमटला आहे.

**इस उम्मीद पे रोज़ चराग़ जलाते हैं।**
**आने वाले बरसों बाद भी आते हैं।।**

ज़ेहरा निगाह म्हणतात, मी रोज दिवे पाजळते. प्रियकराच्या येण्याच्या वाटेकडे डोळे लावून बसते. कारण ज्याला यायचे आहे तो कैक वर्षांनी पण येऊ शकतो.

**शब-ए-विसाल है गुल कर दो इन चराग़ों को।**
**ख़ुशी की बज़्म में क्या काम जलने वालों का।।**

मीलनाची रात्र आहे. या दोन दिव्यांना (डोळ्यांना) विझवून टाक. आनंदाच्या मैफिलीत जळणाऱ्यांचे काय काम?

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील नोंदणी करीता अधिक काम करण्याचा निर्धार

## समितीची पहिली बैठक संपन्न



**संगमनेर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या तालुका स्तरावरील अशासकीय सदस्यांच्या समितीची पहीली बैठक संपन्न झाली असून तालुक्यातील उर्वरित महिलांना योजनेचा लाभ देण्यासाठी येणाऱ्या त्रृटी दूर करून शासकीय यंत्रणेने कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणी करीता तालुका स्तरावर समिती गठीत करण्यात आली असून संगमनेर विधानसभा समितीच्या अध्यक्ष पदावर शरद गोर्डे आणि समिती सदस्य म्हणून रऊफ शेख अतुल कासट यांची निवड झाली आहे.

समितीची बैठक तहसिलदार धीरज मांजरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली या बैठकीला समितीचे शासकीय सदस्य मुख्याधिकारी राहूल वाघ यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.समितीचे अध्यक्ष शरद गोर्डे यांच्यासह सदस्याचा तहसिलदार धीरज मांजरे यांनी सत्कार करून त्यांचे स्वागत केले.

योजना सुरू झाल्यापासून केलेल्या कार्यवाहीचा आढावा बैठकीत घेण्यात आला.आता पर्यत ८० हजार महिलांनी या योजनेसाठी अर्ज दाखल केले आहेत. अन्य राहीलेल्या महिलांचे अर्ज दाखल करण्यासाठी शासन स्तरावरून कार्यवाही अधिक गतीमान करण्याचा निर्णय बैठकीत करण्यात आला.अर्ज दाखल करताना येत असलेल्या त्रृटी तसेच काही कारणाने अर्ज स्विकारले जात नसले तरी अर्जातील चुका दुरूस्त करून महीलांना सहकार्य करण्याबाबत बैठकीत एकमताने निर्णय घेण्यात आला असुन सोमवार दिनांक १२ ते १३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ४ या वेळेत उर्वरित महिला लाभार्थी यांसाठी तालुक्यातील सर्व गावांमध्ये शासकीय यंत्रणेमार्फत शिबिर आयोजित करणार असल्याचे अध्यक्ष शरद गोर्डे यांनी सांगितले. योजनेची अंमलबजावणी यशस्वी सुरू असून तहसिलदार धीरज मांजरे गटविकास अधिकारी नागणे आणि मुख्याधिकारी राहूल वाघ यांनी योजना प्रत्येक गावात आणि महिलांपर्यत पोहचविण्यासाठी केलेल्या कार्यवाहीमुळे संगमनेर तालुका नगर जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असल्याचे समितीचे अध्यक्ष शरद गोर्डे यांनी सांगितले.

# पर्यटकावर दरोडा घालणारे पाच आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नगर : प्रतिनिधी**

**विळद (ता. नगर) परिसरातील गवळीवाडा येथील धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक येत आहेत. मात्र, पर्यटकांवर दरोडा घालणारे पाच आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. सुरेश रणजीत निकम (वय ३०), विलास संजय बर्डे (वय २२), रोहित संदीप शिंदे (वय १९, सर्व रा. कात्रड, ता. राहुरी), ज्ञानेश्वर भानुदास बर्डे (वय २१, मूळ रा. कोंढवड, ता. राहुरी) व शांताराम भानुदास काळकुंड (वय १९, रा. दत्त मंदिरा शेजारी, निंबळक, ता. नगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.**

भिस्तबाग चौकातील पंचवटी नगर येथे राहणारे वैभव सहजराव हे फिरण्यासाठी गवळीवाडा येथील धबधब्यावर गेले होते. त्यावेळी पाच अनोळखी व्यक्तींनी सहजराव यांना मारहाण करत त्यांच्याकडील मोबाईल, चांदीची चैन, अंगठी व रोख रक्कम बळजबरीने हिस्कावून नेली. या प्रकरणी सहजराव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल करून घेतला.

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला होता. त्यानुसार पथकाने राहुरी, नगर तालुका व बोल्हेगाव परिसरातील सराईत गुन्हेगारांची माहिती घेण्यास सुरूवात केली. तसेच तांत्रिक पुराव्यांचा शोध सुरू केला. पथकाला माहिती मिळाली की, राहुरी तालुक्यातील कात्रड येथील सुरेश निकम व विलास बर्डे यांनी हा गुन्हा त्यांच्या तीन साथीदारांसह केला आहे. हे आरोपी कात्रड येथील स्मशानभूमीजवळ उभे आहेत. त्यानुसार पथकाने आरोपींना ताब्यात घेतले. पथकाने आरोपींकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पथकाने पुढील तपासासाठी आरोपींना एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

(पान १ वरून)

### आमच्या घरात माझी भूमिका स्टेपनीची!

दीपक पोकळे हजर नसला तरी त्याचे फोटो असलेले फ्लेक्स परिसरात लागलेले होते. दीपक पोकळे याच्यावर राहता पोलीस ठाण्यात हत्या, गोळीबार आणि लूटमारीचे विविध गुन्हे दाखल आहेत. सध्या तो जामिनावर जेल बाहेर असून जेलमधून सुटल्यानंतर त्याने आपल्या मित्राच्या साथीने सुजयपर्व या नावाने संपर्क कार्यालय सुरू केले. मात्र या संदर्भात सुजय विखे यांना विचारले असता त्यांनी माझ्या नावाचा जर असा कोणी गैरवापर करत असेल तर त्यावर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

### सागर बंगला माझ्या बदनामीसाठी बोलायला लावणारे ठिकाण!

झाले आम्ही शांततेत आंदोलन करत आहोत. पण आमचे शांततेत सुरू असलेले आंदोलन सरकारला कळत नसेल तर आमचा नाइलाज आहे. आम्हाला राजकारण करायचे नाही. यामुळेनिवडणूकलढवायची वेळ आली तर पक्ष काढणार नाही, मात्र अपक्ष उमेदवार उभे करणार.

नेत्यांची माझ्यावर नाराजी असली तर, मराठा समाजाच्या नाराजीचे काय? मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रसह राज्यात संपूर्ण मराठा समाज एक झाला आहे. राजकारण्यांनीच मराठा समाजाची विभागणी केली आहे. मात्र, आता मराठा समाज हुषार झाला आहे. जो मराठा आरक्षणाला पाठिंबा देईल अशांनाही राखीव जागांवर पाठिंबा देऊन उभे करण्यात येईल. दहा टक्के आरक्षण आम्ही मागितले नव्हते. मात्र, तरीही सरकारने दिले, ही सरकारची चूक आहे, असे जरांगे म्हणाले.

उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांनी माझ्या विरोधात बोलण्यासाठी पाच-सहा गट तयार केले आहेत असा आरोप करून जरांगे म्हणाले, ज्यावेळी माणूस कशातच सापडत नाही, त्यावेळी बदनामीची मोहीम राबविण्यात येते. बदनामी करण्यासाठी बोलायला लावणारे ठिकाण म्हणजे मुंबईतील उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा सागर बंगला आहे.

### निंबळकच्या उड्डाणपुलाचे गाऱ्हाणे रेल्वेमंत्र्यांकडे!

नगर शहरात असल्याने या रस्त्याने एखादा रूग्ण नगरला नेताना गेट बंद असल्यास रूग्ण दगावण्याची भीती असते. त्यासाठी या रेल्वे मार्गावर उडडाण पुलाची अत्यंत आवष्यकता असून तसे झाल्यास २५ ते ३० गावांमधील प्रवाशांचा अनेक वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी लागेल असे खा. लंके यांनी आपल्या निवेदनात नमुद केले आहे.

### अजित पवारांच्या पिंक पॉलिटिक्सवर सर्वत्र चर्चा

केलेल्या टीकेवरअमोल मिटकरीयांनी प्रत्युत्तर दिले आहे. "अजितदादांनी जनसन्मान यात्रेत निर्माण केलेल्या झंजावाताने तुतारी गट बिथरला आहे. गुलाबी रंगाचे वावडे असणाऱ्या खासदाराला स्वतः ला गुलाबी रंग लावताना मात्र फार आनंद वाटतो. लोकसभेत थोडे यश काय मिळाले हा गडी तर जनतेला "नागोबा" म्हणायला निघाला", असे अमोल मिटकरी म्हणाले.






# अथक प्रयत्नांतून मिळविलेले यश प्रेरणादायी

## काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन | राहुल बांगरची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

जामगांव : प्रतिनिधी

**तेरा वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर जामगांवच्या राहुल गोवर्धन बांगर याची पोलीस निरीक्षकपदी झालेली निवड ही इतर तरूणांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे मा. सभापती काशिनाथ दाते यांनी केले.**

राहुल बांगर याने मिळविलेल्या यशाबद्दल आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात काशिनाथ दाते यांनी राहुल याने परिश्रमातून मिळविलेल्या यशाचे कौतुक केले. यावेळी सुभाष दुधाडे, बबलू रोहोकले, किसन भुजबळ, एकनाथ धुरपते, योगेश शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

दाते म्हणाले, राहुलच्या यशामध्ये त्याची आई तसेच नातेवाईकांचेही योगदान आहे. जामगांवमधील शेतकरी कुटूंबातील राहुल पोलीस दलात उपनिरीक्षक पदावर पोहचला ही त्यांच्या कुटूंबासाठी आणि गावासाठी अभिमानाची बाब आहे. यापूर्वीही धुरपते व सोबले कुटूंबातील तरूणांनी असेच यश संपादन केले असून राहुलच्या या यशामुळे जामगांवच्या गौरवशाली वैभवात भर पडली आहे. आपल्या पदावर काम करताना सर्वसामान्यांना न्याय देण्याची भुमीका राहुल बजावेल असा विश्वास दाते यांनी यावेळी व्यक्त केला.

बबलू रोहोकले, सुभाष दुधाडे, बाळासाहेब माळी, किसन भुजबळ, योगेश शिंदे यांनीही यावेळी आपल्या भाषणातून राहुल यास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. नंदू शिंदे यांनी सुत्रसंचलन केले तर पप्पू बांगर यांनी आभार मानले.




■ पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबददल राहुल बांगर याचा काशिनाथ दाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### अपयशने खचलो नाही

**पोलीस उपनिरीक्षक होण्याचे माझे स्वप्न होते. अनेकदा अपयश आले, मात्र खचून न जाता अभ्यासात सातत्य ठेवले. आईने मला मोलाची साथ दिली. चुलते स्व.विजय बांगर, आजोबा नाथू बांगर, चुलते पप्पू बांगर व मित्रांनी आर्थिक मदत केली. पुण्यातील रयत प्रबोधीनीचे उमेश कुदने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.**

**राहुल बांगर**
**पोलीस उपनिरीक्षक**

### सवाद्य मिरवणूक

**यावेळी राहुल बांगरची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात येऊन या कौतुक सोहळयास प्रारंभ झाला. बांगरवाडी येथे पार पडलेल्या कार्यक्रमात काशिनाथ दाते यांच्या हस्ते राहुल याचा सत्कार करण्यात आला. स्थानिक पदाधिकारी तसेच इतरांनीही राहुल तसेच परिवाराचा सन्मान केला. यावेळी शंकर महांडुळे, नवनाथ बांगर, विष्णूपंत नाईक, विनायक रोहोकले, सरपंच राजेंद्र नाईक आदी उपस्थित होते.**

# अभ्यासाबरोबरच आरोग्याकडेही लक्ष द्या!

## ■ दीपक लंके यांचे आवाहन ■ अंबिका विद्यालयात मोफत रक्तगट तपासणी

देवीभोयरे : प्रतिनिधी

**धकाधकीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून निरोगी शरीरासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आरोग्याकडेही लक्ष देण्याचे आवाहन दीपक लंके यांनी केले.**



(छाया - सुरेश गाडीलकर)

खा. नीलेश लंके व अंबिका ग्रामविकास प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली देवीभोयरे येथील श्री अंबिका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थ्यांनींची मोफत रक्तगट तपासणी करण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन लंके यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सरपंच अशोक मुळे, सत्यम निमसे, प्रचार्य राजेंद्र वाघ, लॅब टेक्निशियन विशाल केदारी, विनोद साळवे, डॉ. स्वाती बेलोटे, डॉ. वाखारे, डॉ. जगदीश कुसकर, विनोद शिवाजी साळवे, भाउसाहेब सरडे, अक्षय बेलोटे, भानुदास केदारी आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना लंके म्हणाले, प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली असून विद्यार्थी दिवसभर अभ्यासात व्यस्त असतात. त्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होउन व्याधींना समोरे जावे लागते. विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा, त्याबरोबरच आरोग्याकडेही लक्ष द्यावे. व्यायाम, मैदानी खेळ खेळून आपले शरीर सुदृढ कसे राहील याची काळजी घ्यावी. मैदानी खेळांऐवजी विद्यार्थी मोबाईलकडे आकर्षीत होत असून त्यातून निर्माण होणा-या समस्याही चिंताजनक आहेत. मोबाईलचा गरजेपुरता वापर करून विद्यार्थ्यांनी अभ्यास व खेळाकडे लक्ष देण्याचे आवाहन लंके यांनी यावेळी केले.

यावेळी संस्थेचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांनीही मार्गदर्शन केले. सुदाम म्हस्के यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तर राजेंद्र वाघ यांनी आभार मानले.

# बाभुळवाडयात जागतिक आदिवासी दिन साजरा

## क्रांतीकारकांची मिरवणूक काढून अभिवादन



बाभुळवाडे : प्रतिनिधी

**बाभुळवाडे येथे जागतिक आदिवासी दिन विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला. यावेळी क्रांतीकारकांची मिरवणूक काढून अभिवादन करण्यात आले.**

ठाकरवाडी येथील आदिवासी बांधवांनी काम बंद ठेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सकाळी सात ते दहा क्रांतीकारकांची मिरवणूक काढण्यात येऊन सकाळी दहा वाजता पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात मान्यवरांनी आपले मनोगत व्यकत केले.

पारनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेवा विभागाचे प्रा. भरत डगळे, प्रा. नितिन देशमुख, सुरेश गाडीलकर आदी यावेळी उपस्थित होते. सरपंच वैशाली जगदाळे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले. उपसरपंच बाळासाहेब नवले यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थांनी या कार्यक्रमास उत्सफुर्तपणे हजेरी लावली होती. महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

आदिवासी समाजातील बिरसा मुंड हे स्वातंत्र्य सेनानी आणि आदिवासींचे नेते होते. ब्रिटीश शासनाविरोधात सशक्त विद्रोह करणाऱ्यामुंडा यांनी केवळ स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले नाही तर आदिवासी समाजाच्या उत्कर्षासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. ब्रिटीशांकडून आदिवासींवर होणारा अन्याय पाहून बिरसा मुंडा यांनी इंग्रजांनी लागू केलेली जमीनदारी पध्दत आणि राजस्व व्यवस्थेविरोधात लढा उभारतानाच जंगल-जमीनीचीही लढाई सुरू केली. आदिवासींची अस्मिता, स्वायतत्ता आणि संस्कृतीला वाचविण्यासाठी त्यांनी हा संग्राम उभा केला होता. पूर्वीचा संघर्ष विसरून बिरसा मुंडा यांनी सर्व आदिवासींना संघटीत करून महाविद्रोह आंदोलन छेडले होते. मुंडा यांनी समाजातील गरीबीकडे लक्ष दिले. आदिवासींना अनेक समस्यांनी ग्रासले होते आणि त्याचा फायदा इतर समुदाय घेत होते. त्यापासून आदिवासींना दुर ठेवण्यासाठी मुंडा यांनी परीश्रम घेतल्याचे यावेळी विविध वक्त्यांनी सांगितले.

# शिवसेनेच्या मशाल यात्रेला तालुक्यातून उत्सफुर्त प्रतिसाद

## ■ गावागावात-वाड्यावस्त्यांवर जल्लोषात स्वागत ■ उद्धव ठाकरे हेच मुख्यमंत्री होतील ■ डॉ.श्रीकांत पठारे यांचा विश्वास

पारनेर : प्रतिनिधी

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पारनेर तालुक्यात तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्त्वाखाली भगवा सप्ताहानिमित्त आयोजित भव्य मशाल यात्रेला पारनेर तालुक्यातून नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून तालुक्यातील गावोगावी आणि वाड्यावस्त्यांवर या यात्रेचे जल्लोषात स्वागत केले जात आहे.**

तालुक्यातील सर्वच स्तरातील नागरिकांनी पुन्हा एकदा उध्दव ठाकरे हेच मुख्यमंत्री व्हावेत अशी मनोकामना व्यक्त केली आहे. तसेच पारनेर-नगर मतदारसंघाची विधानसभेची जागा महाविकास आघाडीमधून शिवसेनेलाच घेण्याची मागणी केलेली आहे. आम्ही सर्वच गावांतील सर्वधर्मीय देवदेवतांचे दर्शन घेत असून त्यांच्या आशिर्वादाने पुन्हा एकदा नक्कीच उध्दव ठाकरे हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील आणि राज्यात सर्वसामान्यांचे सरकार येईल असा विश्वास डॉ. श्रीकांत पठारे यांनी व्यक्त केला आहे.

डॉ.श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्त्वाखाली टाकळी ढोकेश्वर येथून सुरु झालेली मशाल यात्रा टाकळी ढोकेश्वर, ढवळपुरी, कान्हुर पठार जिल्हा परिषद गटांतील गावोगावी व वाड्या वस्त्यांवर पोहचली असून शिवसेनेच्या मशाल चिन्हाचा प्रचार आणि प्रसार याठिकाणी करण्यात आलेला आहे. सुपा व निघोज गटामध्ये आता ही यात्रा पोहचणार असून नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातुन डॉ.श्रीकांत पठारे हे करत असून त्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी यात्रा संपल्यावर सातत्याने पाठपुरावा करुन प्रयत्न करणार असल्याचे डॉ.श्रीकांत पठारे हे नागरिकांना आश्वस्त करत आहेत.



डॉ.श्रीकांत पठारे यांनी या यात्रेदरम्यान शेतकरी, आजी-माजी सैनिक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, महिला बचत गट, भजनी मंडळे, युवकांची विविध मंडळे व संस्था, गावोगावचे विविध संस्थांचे पदाधिकारी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्ती, वयोवृद्ध, अपंग ग्रामस्थ, शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी, विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केल्या असून त्यांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आहेत, तसेच त्यांच्याकडून मार्गदर्शनही घेतले आहे आणि त्यांच्या सूचना अभिप्राय स्वरूपात पक्षश्रेष्ठींकडे पाठवणार असल्याचे डॉ.श्रीकांत पठारे यांनी सांगितले आहे.

डॉ.पठारे यांच्यासोबत या यात्रेमध्ये युवासेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, महिलाआघाडी तालुकाप्रमुख प्रियंका खिलारी, शेतकरीआघाडी तालुकाप्रमुख गुलाबराव नवले, जेष्ठ नेते डॉ.भास्कर शिरोळे, शिववाहतूक सेनेचे राज्य उपाध्यक्ष धनंजय निमसे, बाजार समिती संचालक किसन सुपेकर, बाबासाहेब नऱ्हे, माजी पंचायत समिती पोपट चौधरी, कान्हुर पठार गटप्रमुख बाबासाहेव रेपाळे, टाकळी ढोकेश्वर गटप्रमुख अनिकेत देशमाने, अळकुटी विभागप्रमुख सखाराम उजागरे, गटप्रमुख संतोष येवले, गणप्रमुख संतोष साबळे, नितीन आहेर, सरपंच रामदास खोसे, माजी सरपंच देवराम मगर, शेतकरी आघाडी उपतालुकाप्रमुख किसन चौधरी, दिपक मावळे, युवासेना पदाधिकारी सुयोग टेकुडे, मोहन पवार, अक्षय दुश्मन, अक्षय गोरडे, प्रशांत निंबाळकर, मोहित जाधव, अभिजीत खरमाळे, मंगेश सालके, अशोक भोसले, प्रशांत पठारे, विशाल पठारे, गोरख पठारे, स्वप्नील पुजारी, महेंद्र पांढरकर, ऋषिकेश नरसाळे, दिपक सुपेकर, डॉ.नीता पठारे, मंगल पठारे, प्रमोद पठारे, ऋषिकेश माने, अक्षय फापाळे, पप्पू रोकडे यांसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

# सुवर्णा रोहोकले-खरमाळे सेट उत्तीर्ण; पीएचडी करण्याचा मानस

भाळवणी : प्रतिनिधी



**भाळवणी येथील दत्तात्रय रावसाहेब रोहोकले यांची कन्या आणि संपत खरमाळे यांच्या पत्नी प्रा. सुवर्णा रोहोकले-खरमाळे यांनी महाराष्ट्र सेट परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे. आता हिंदी विषयात फिलॉसॉफी ऑफ डॉक्टरेट करण्याचा त्यांचा मानस आहे.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र सेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून हिंदी विषयात रोहोकले-खरमाळे यांनी पहिल्याच परीक्षेत यशाला गवसणी घातली.

सुवर्णा रोहोकले यांनी परिवाराच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करून त्या यशस्वीपणे क्वालीफाईड सहाय्यक प्राध्यापिका झाल्या आहेत. याच विषयात सखोल अभ्यास करून हिंदी विषयात फिलॉसॉफी ऑफ डॉक्टरेट करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांच्या जिद्द व चिकाटीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल अभिनंदनही करण्यात येत आहे.

# तात्याभाऊ थोरात यांचे निधन

निघोज : प्रतिनिधी



**पारनेर तालुक्यातील पिंपरी जलसेन येथील शेतकरी तात्याभाऊ नारायण थोरात यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचा नेहमीच सहभाग होता.**

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले तीन मुली सुना नातू, जावई असा मोठा परिवार आहे. मुंबई येथे कार्यरत असणारे दत्तात्रय थोरात, वाल्मिक थोरात, निघोज येथील तेजस्विनी महिला बचत गट, मळगंगा बचत गटाच्या पदाधिकारी निशा दत्तात्रय लंके, लता विलास राक्षे, मनिषा योगेश गोपाळे यांचे ते वडील होत. निघोज येथील मळगंगा साईधाम गणेश मंडळाचे संस्थापक पदाधिकारी व शिरूर येथील सेनापती बापट पतसंस्थेचे शाखाधिकारी दत्तात्रय लंके यांचे ते सासरे होत.

# पठारवाडी सोसायटीच्या चेअरमनपदी गुलाबराव पठारे

## व्हा.चेअरमनपदी सिद्धेश्वर पठारे यांची बिनविरोध निवड

निघोज : प्रतिनिधी

**पठारवाडी सोसायटीच्या चेअरमनपदी गुलाबराव पठारे यांची व व्हा. चेअरमनपदी सिद्धेश्वर पठारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संचालक मंडळाची गुरुवार दि.९ रोजी सोसायटी सभागृहात बैठक घेण्यात आली. चेअरमन व व्हा.चेअरमन यांच्या निवडीचा ठराव माजी चेअरमन सुखदेव पठारे यांनी मांडला व त्यास संचालक किरण सुपेकर यांनी सर्व संचालकांच्या वतीने अनुमोदन दिले.**

यावेळी बाजार समितीचे संचालक किसनराव सुपेकर ,सरपंच भास्करराव सुपेकर , उपसरपंच भिका पठारे ,ज्येष्ठ नेते पिराजी पवार, भानुदास पठारे , माजी उपसरपंच दौलतराव सुपेकर, युवा सेना उपतालुका प्रमुख मोहन पवार, ग्रामपंचायत सदस्य शंकरराव पठारे , संचालक अनिल सुपेकर, संचालक ज्ञानदेव पवार , जैवताबाई सुपेकर, मनीषा पवार , सेवानिवृत्त मेजर संजय सुपेकर , संतोष पठारे, नानासाहेब पठारे ,संदीप सुपेकर, सौरभ पवार , सोमनाथ सुपेकर, संचालक खंडू बोदगे , हनुमंत भोसले, जयसिंगराव पवार , भरत पवार, संस्थेचे सचिव पुंड भाऊसाहेब आदी तसेच सोसायटीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या निवडीचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे. नूतन पदाधिकाऱ्यांची निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर दक्षिणचे खासदार निलेशजी लंके , शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख डॉ .श्रीकांत पठारे , शिवसेना नेते डॉक्टर भास्करराव शिरोळे यांनी चेअरमन व व्हा. चेअरमन यांचे अभिनंदन केले आहे.

नूतन चेअरमन गुलाबराव पठारे व सिद्धेश्वर पठारे यावेळी म्हणाले गेली पंचवीस वर्षांपासून बाजार समितीचे संचालक व सोसायटीचे संस्थापक मा.चेअरमन किसनराव सुपेकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात विकासयोजना राबविण्यासाठी योगदान दिले आहे. पठारवाडी गावच्या विकासात सोसायटीचे मोठ्या प्रमाणात योगदान असून हीच उज्वल परंपरा कायम राहण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# भोयरे गांगर्डात शनिवारपासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

## वस्तीनिहाय पंगत घेऊन जपला जातोय धार्मिक एकोपा

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथे शनिवार दि. १० रोजी मोठ्या भक्तीमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ होणार असून सप्ताहाची तयारी पूर्ण झाली असून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असल्याची माहिती सरपंच रोहिणी संतोष केकडे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड यांनी दिली.**

आठ दिवस चालणाऱ्या या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ७:३० विष्णू सहस्त्रनाम प्रार्थना, सकाळी ७:३० ते ११:३० ज्ञानेश्वर पारायण, ११:३० गाथा भजन, दुपारी २:३० ते ४:३० ज्ञानेश्वर पारायण, सायंकाळी ४:३० ते ५:३० प्रवचन, सायंकाळी ५:३० ते ६:३० हरिपाठ, ७ ते ९ नामवंत किर्तनकारांचे किर्तन होईल, रात्री १० नंतर हरिजागर होईल.



यादरम्यान हभप देवराम महाराज गांगड (भोयरे गांगर्डा), कालिदास महाराज भोगाडे (भोयरे गांगर्डा), प्रविण महाराज जवक (सुपा), राजेंद्र महाराज शहाणे (सुपा), चिमाजी महाराज गायकवाड (कडुस), गणेश महाराज कोल्हे (मोटेवाडी) आदींचे ४:३० ते ५:३० दरम्यान प्रवचन होईल. शुक्रवार दि.१६ रोजी दिंडी प्रदक्षिणा घालण्यात येईल.

सायंकाळी ७ ते ९ हभप सार्थक महाराज दळवी (हंगा), जयसिंग महाराज इथापे (एरंडोली), संतोष महाराज कौठाळे (देवदैठण), आदिनाथ महाराज आंधळे (माणिक दौडी), शामसुंदर महाराज ढवळे (दौण्ड), काका महाराज पहाणे (पंढरपूर), दयानंद महाराज कोरेगावकर (कर्जत) आदींचे किर्तन होईल. शनिवार दि. १७ रोजी सकाळी ९.३० ते११.३० हभप गोविंद महाराज चौधरी (जळगाव) यांचे काल्याचे किर्तन होईल.

यादरम्यान रात्री १० नंतर भोयरे गांगर्डा,चांभुर्डी, सारोळा सोमवंशी, मुंगशी, कडूस, बाबुर्डी आदी भजनी मंडळाच्या वतीने हरिजागर होईल.दरम्यान सप्ताह दरम्यान मुंजोबा मळा वाघजई, रसाळवाडी, विठ्ठलवाडी, गावठाण लगड,सातपुते,डोंगरे,पवारवस्ती, गायकवाड, डोंगरे, गरदारे, कामठेवस्ती आदी वस्तीनिहाय महाप्रसाद ठेवत गावात धार्मिक एकोपा जपला जात आहे.आठ दिवस चालणाऱ्या या सप्ताह दरम्यान होणा-या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन भोयरे गांगर्डा ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# तालुका पत्रकार संघाच्या वतीने खा. लंके यांचा सत्कार

## पत्रकारांचा स्नेहमेळावा आणि गुणवंतांचा गौरव | अण्णा हजारे यांची उपस्थिती

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने खासदार नीलेश लंके यांचा लोकसभा निवडणूकीत यश संपादन केल्याबददल ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते शनिवारी सत्कार करण्यात येणार असून राळेगणसिध्दीमध्ये पार पडणाऱ्या या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पत्रकारांचा स्नेहमेळावा तसेच पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव यावेळी करण्यात येणार आहे.**




शनिवार दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा ते अकरा स्वागत व चहापान, सकाळी ११ ते १२ गुणगौरव सोहळा व मार्गदर्शन, दुपारी साडेबारा ते दिड स्नेहभोजन असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे तसेच खासदार नीलेश लंके हे मार्गदर्शन करणार आहेत. अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत नीलेश लंके यांच्या रूपाने पारनेर तालुक्याला प्रथमच संधी मिळाल्याबद्दल त्यांचा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय शेरकर, कार्याध्यक्ष दत्ता उनवणे यांनी केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com